▶ वर्ष–३

■ अंक–२४

# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

आता डिजिटल स्वरूपात...
दिवा न्यूजची वेबसाईट सुरू..!
ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा
www.diwanews.com
आता कुठेही असा...दिवा न्यूज वाचा एका क्लिक वर..
epaper.diwanews.com

■ epaper.diwanews.com ■ सोमवार, १५ जानेवारी २०२४ ■ पाने–८ ■ किंमत ४ रु. ■ RNI No.-MAHMAR/2021/80669 ■ www.diwanews.com


# पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंच्या दौऱ्यामुळे दिवा शहरातील मराठी माणसाला अन्यायाविरोधात लढण्याची ताकद मिळाली! - रोहीदास मुंडे




**दिवा:**–शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या दिवा शहरातील दौऱ्यामुळे शिवसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून दिव्यातील मराठी माणूस व उद्धव ठाकरे प्रेमी जनतेला अन्यायाविरोधात लढण्याची नवी ताकद मिळाली असल्याचे मत ठाकरेंच्या शिवसेनेचे दिवा शहर संघटक रोहिदास मुंडे यांनी दिवा न्यूज सोबत बोलताना व्यक्त केले.

पक्ष फुटीच्या साधारण दीड वर्षानंतर उद्धव ठाकरे यांनी कल्याण लोकसभेचा धावता दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी विविध ठिकाणच्या शाखांना भेट देत शिवसैनिकांशी संवाद साधला.दिवा शहरात उद्धव ठाकरे हे प्रथमच आल्याने येथील शिवसैनिकांमध्ये आधीपासूनच उत्साहाचे वातावरण होते.दिवा शहरातील सर्वसामान्य नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांना थेट शिवसेना पक्ष नेतृत्वाने वाचा फोडल्याने येथील मराठी माणसाला अन्याय विरोधात लढण्याची ताकद मिळाली असल्याचा दावा रोहिदास मुंडे यांनी केला.दिव्यातील पाणी प्रश्नावर उद्धव ठाकरे यांनी ठाकरी शैलीत भाष्य करत पाणीटंचाईला जबाबदार असणाऱ्यांना पाण्यात बुडवा असे वक्तव्य करून दिव्यातील शिवसैनिक,मराठी माणूस व उद्धव ठाकरे प्रेमी तमाम जनतेला लढण्याची ताकद दिली, असे मत रोहिदास मुंडे यांनी या दौऱ्यानंतर व्यक्त केले. आगामी काळात दिवा शहरात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष येथील नागरिकांच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी अधिक आक्रम कपणे लढेल असा विश्वासही रोहिदास मुंडे यांनी व्यक्त केला.पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या दौऱ्यामुळे दिवा शहरातील महाराष्ट्र प्रेमी व लोकशाहीप्रेमी जनतेमध्ये उत्साहाचे वातावरण असल्याचे रोहिदास मुंडे म्हणाले.

# उपवन तलावाचे सौंदर्य आणखी उजळले!

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे प्रतिपादन

## संगीतमय कारंजे आणि घाटाचे मुख्यमंत्री महोदयांनी केले लोकार्पण

**ठाणे :** ऐतिहासिक ओळख असलेल्या निसर्गरम्य अशा उपवन तलावाचे सौंदर्य संगीतमय कारंजे आणि बनारसच्या धर्तीवरील घाटामुळे आणखी उजळले आहे, असे प्रतिपादन मा. मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी केले.

आमदार प्रताप सरनाईक यांच्या प्रयत्नांमुळे राज्य सरकारने दिलेल्या निधीतून, ठाणे महापालिकेने उपवन तलाव येथे संगीतमय कारंजे आणि घाट यांची उभारणी केली आहे. संगीतमय कारंजे हे वॉटर स्क्रीनसह आहेत. त्यावर, दाखविण्यासाठी मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेतील तीन शो तयार करण्यात आले आहेत. त्यांचे दिग्दर्शन विजू माने यांचे आहे. छत्रपती शिवाजी महाराज, ठाणे शहराचा इतिहास आणि राम मंदिर असे या शोंचे विषय आहेत. हे कारंजे आणि घाट यांचे लोकार्पण मा. मुख्यमंत्री महोदय यांनी संस्कृती कला उत्सवाच्या तरंग या पाण्यावरील रंगमंचावर केले. त्याप्रसंगी, खासदार श्रीकांत शिंदे, आमदार प्रताप सरनाईक, ज्येष्ठ गायिका अनुराधा पौडवाल, माजी आमदार रवींद्र फाटक, माजी नगरसेविका परिषा सरनाईक, आशा डोंगरे, जयश्री डेव्हिड, माजी नगरसेवक पुर्वेश सरनाईक, महापालिका आयुक्त अभिजीत बांगर आदी मान्यवर उपस्थित होते.

ठाणे शहर आता बदलू लागले आहे. स्वच्छ होत आहे, रस्ते चांगले होत आहेत. महापालिकेची सर्वंकष स्वच्छता मोहीम उत्तम सुरू आहे. आपल्याला ठाणे शहर स्वच्छ, सुंदर



आणि निरोगी करायचे आहे, असे मुख्यमंत्री महोदय याप्रसंगी म्हणाले. उपवन तलाव परिसरात ठाणेकर आतापर्यंत फक्त चालायला, फिरायला यायचे आता त्यांना या संगीतमय कारंजाचाही आनंद घेता येईल. नागपूरला फुटाळा तलावातील कारंजे पाहिल्यावर आमदार प्रताप सरनाईक यांना असे कारंजे ठाण्यात करण्याबद्दल बोललो होतो. त्यांनी पुढाकार घेऊन वर्षभरात कारंजे सुरू करूनही दाखवले, असेही मुख्यमंत्री महोदयांनी नमूद केले. तसेच, येथील शो विनामूल्य ठेवावेत, असे निर्देशही त्यांनी महापालिका आयुक्तांना दिले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माझ्या मतदारसंघाला, ठाण्याला भरभरुन दिले आहे. त्यामुळे वेगवेगळे प्रकल्प साकारणे शक्य झाले आहे. अशी आणखी दोन संगीतमय कारंजी लवकरच सुरू होतील, अशी माहिती आमदार श्री. प्रताप सरनाईक यांनी याप्रसंगी दिली. याच कार्यक्रमात, चित्रकार किरण कुंभार यांना मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते शिवगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. किरण कुंभार यांचे एक चित्र अयोध्येतील राम मंदिरात लावण्यासाठी निवडण्यात आले आहे. त्याची प्रतिकृती कुंभार यांनी मुख्यमंत्री महोदयांना भेट दिली. ज्येष्ठ गायिका अनुराधा पौडवाल यांचा तसेच, संदीप वेंगुर्लेकर यांचाही मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. उद्घाटन समारंभापूर्वी अनुराधा पौडवाल यांच्या हिंदी व मराठी गीतांचा कार्यक्रम झाला.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. १५ जानेवारी २०२४
पान : २
www.diwanews.com

# शहरात सुरु असलेली रस्ते, शौचालय व शाळा दुरूस्तीची कामे ही ३१ जानेवारीपर्यंत पूर्ण करण्याचे आयुक्त अभिजीत बांगर यांचे निर्देश



**ठाणे – ठाणे शहरात मुख्यमंत्र्यांचे बदलते ठाणे अंतर्गत स्वच्छता, शौचालय, खड्डेमुक्त रस्ते आणि सौंदर्यीकरण ही कामे हाती घेण्यात आली होती. खड्डेमुक्त रस्त्यांसाठी काँक्रिटीकरण, यूटीडब्ल्यूटी व डांबरीकरण पध्दतीच्या रस्त्याची हाती घेण्यात आलेली बहुतांश कामे पुर्णत्वाच्या मार्गावर आहेत. तसेच शौचालयाचे नुतनीकरण, शाळा इमारत दुरूस्तीची कामेही सुरू आहेत. परंतु पावसाळ्यामुळे काही कामे थांबविण्यात आली होती. पावसाळ्यानंतर सदरची कामे सुरू झाली असून या कामाचा आढावा घेवून सर्व कामे ३१ जानेवारी २०२४ पूर्वी पूर्ण करावीत असे निर्देश आज झालेल्या बैठकीत आयुक्त अभिजीत बांगर यांनी नुकत्याच झालेल्या बैठकीत सर्व कार्यकारी अभियंत्यांना दिले.**

महापालिका कार्यक्षेत्रात सुरू असलेल्या विविध कामांचा प्रभाग समितीनिहाय आढावा आज झालेल्या बैठकीत घेण्यात आला. सद्यस्थितीत सुरू असलेली सर्व कामे अंमलबजावणीच्या अंतिम टप्प्यात आहेत. बहुतांश रस्त्यांची कामे पूर्ण झाली आहेत. तर जमीन महापालिकेची नसल्यामुळे काही कामास विलंब होत असल्याचे बैठकीत कार्यकारी अभियंत्यांकडून नमूद करण्यात आले. मात्र पावसाळ्यानंतर कामे विलंबाने तसेच टप्प्याटप्प्याने सुरू केल्याबाबत आयुक्तांनी संबंधित कार्यकारी अभियंत्यांना याचा जाब विचारत याबाबत आवश्यक तो पत्रव्यवहार व पाठपुरावा करुन सदर कामे युद्धपातळीवर पूर्ण होतील या दृष्टीने सर्वांनी सजग राहून काम करण्याचा इशारा दिला. तसेच रस्त्यांशी संलग्न असलेली कामे उदा. केबल्स, गॅस पाईपलाईन, ड्रेनेज लाईन, महावितरणची केबल्स आदी कामे तातडीने पूर्ण होतील यासाठी देखील संबंधित प्राधिकरणांशी पत्रव्यवहार करुन पुढील कार्यवाही करावी असेही आयुक्तांनी स्पष्ट केले. काही रस्त्यांची कामे अत्यंत समाधानकारक झाली असून तशाच प्रकारची कामे सर्वांकडून अपेक्षित असल्याचे आयुक्त श्री. बांगर यांनी नमूद केले.

बहुतांश शौचालयांमध्ये शौचालयांची तोडफोड करणे, कडी कोयंडे काढून नेणे, दरवाजे तोडणे, शौचालयाचे भांडे फोडणे अशा गैरप्रकारामुळे शौचालयांची दुरावस्था होत असल्याचे कार्यकारी अभियंत्यांनी निदर्शनास आणले. अशा घटनांची पुनरावृत्ती होवू नये यासाठी स्थानिक स्तरावरील नागरिकांशी सुसंवाद साधून शौचालयाची जबाबदारी त्यांचेवर सोपविल्यास किंवा अशी कृत्ये करणारे गर्दुल्ले निदर्शनास आल्यास सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केल्याप्रकरणी पोलीसांत तक्रार दाखल करण्यात यावी असेही आयुक्तांनी सूचित केले. तसेच काही शौचालयांसाठी सुरक्षारक्षक नेमण्याबाबतची प्रक्रिया सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

या बैठकीस नगर अभियंता प्रशांत सोनग्रा, उपनगरअभियंता विकास ढोले, रामदास शिंदे तसेच सर्व प्रभागसमितीचे कार्यकारी अभियंता उपस्थित होते.

## शौचालयांची कामे देखील १५ दिवसांत पूर्ण करावीत

**महापालिका कार्यक्षेत्रात सर्वच प्रभागसमितीअंतर्गत विविध ठिकाणी शौचालयांच्या दुरूस्ती व नुतनीकरणाची कामे सुरू आहेत. या कामांचा दर्जा देखील उच्चप्रतीचा असेल या दृष्टीने सर्वांनी कटाक्ष ठेवावा. हाजुरी या ठिकाणचे सार्वजनिक शौचालयाच्या आजूबाजूचा परिसर हा सुशोभित करुन अत्यंत चांगल्या प्रकारचे काम झाले असल्याचे आयुक्तांनी बैठकीत नमूद करीत सर्व शौचालयांची कामे विहित मुदतीत होतील या दृष्टीने कामे पूर्ण करावीत. सद्यस्थितीत शौचालयाची कामे ७० ते ७५% पूर्ण झाली असली तरी येत्या १५ दिवसात पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित कार्यकारी अभियंत्यांनी पूर्ण करावीत असे आयुक्त बांगर यांनी सांगितले.**

## शाळा इमारती या उच्चदर्जाच्या असाव्यात

शहराचा विकास करत असताना महापालिकेच्या शाळा देखील सुस्थितीत असणे आवश्यक आहे. महापालिका शाळांमध्ये शिक्षण घेत असलेले विद्यार्थी हे गोरगरीब कुटुंबातील असतात, या मुलांना देखील चांगल्या वातावरणात शिक्षण घेता यावेत यासाठी आपल्या शाळा इमारती या जागतिक दर्जाच्या असल्या पाहिजेत, यामुळे सद्यस्थितीत सुरू असलेले काम हे दर्जेदार होईल, यामध्ये कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही. यासाठी जर अतिरिक्त निधीची आवश्यकता असेल तर तो निधीही कमी पडू देणार नाही असेही आयुक्त बांगर यांनी नमूद केले. तर दिवा भागातील शाळा बांधकामाकडे विशेष लक्ष द्यावे. तसेच सर्व शाळांमधील शौचालय देखील नियमित स्वच्छ राहतील याकडे लक्ष द्यावे. तसेच उर्वरित शाळांच्या दुरूस्ती व नुतनीकरणाबाबतचा आराखडा उपायुक्त शिक्षण यांनी तयार करावा असेही या बैठकीत आयुक्तांनी नमूद केले.

# परिचर्या व्यवसायात ज्ञान व कौशल्य यांच्यासोबत करुणेचीही जोड आवश्यक – उपायुक्त उमेश बिरार

**ठाणे :** परिचर्या व्यवसायात ज्ञान व कौशल्य ही दोन प्रमुख वैशिष्ट्ये असून याच्या जोडीला करुणा हेही तेवढेच महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य असल्याचे प्रतिपादन उपायुक्त (आरोग्य) उमेश बिरारी यांनी सौ. मीनाताई ठाकरे परिचर्या प्रशिक्षण संस्थेच्या पदवीदान समारंभात केले. ३० विद्यार्थीनीना या सोहळ्यात पदवी प्रदान करण्यात आली. डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे बुधवारी झालेल्या या पदवीदान सोहळ्यात, सौ. मीनाताई ठाकरे परिचर्या प्रशिक्षण संस्थेच्या प्रथम वर्ष जनरल नर्सिंग आणि मिडवायफरी, ऑगस्ट २०२३च्या बॅचचा शपथग्रहण समारंभ, तृतीय वर्ष विद्यार्थिनींचा पदवीदान समारंभ, तसेच यशस्वीरित्या अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थिनींचा गुणगौरव समारंभ आयोजित करण्यात आला होता.

यावेळी विद्यार्थिनींशी संवाद साधताना, आगामी काळात ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीत ६८ आरोग्यवर्धिनी केंद्र सुरू होत असल्याने परिचारिकाची गरज भासणार असल्याची माहिती बिरारी यांनी दिली. तसेच, पदवीप्राप्त विद्यार्थीनींनी उच्च शिक्षण घेऊन विशेष प्रशिक्षण मिळवावे. त्याचबरोबर, स्पर्धा परीक्षेच्या दृष्टीने अवांतर वाचनही करावे, असेही बिरारी म्हणाले. या कार्यक्रमास, सायन येथील लोकमान्य टिळक स्कूल ऑफ नर्सिंगच्या माजी उप प्राचार्या मीना पाटोळे, राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय यांचे अधिष्ठाता डॉ. राकेश बरोट, प्रभारी अधिसेविका भारती देशपांडे उपस्थित होते. नर्सिंग ट्युटर सुनिता गुरूसाळे यांनी प्रथम वर्ष विद्यार्थिनींना परिचर्या व्यवसायाची शपथ दिली. शबाना जबीर खान या विद्यार्थिनीला इंदुबाई रामराव जपे उत्कृष्ट विद्यार्थिनी पारितोषिक तसेच, सुलोचना रामचंद्र अय्यर सुवर्णपदक देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थिनींनी जी शपथ घेतली आहे त्यातील प्रत्येक शब्दाशी प्रामाणिक राहून काम करणे म्हणजेच उत्कृष्ट परिचारीका असणे असे प्रतिपादन मीना पाटोळे यांनी याप्रसंगी केले. शिस्त, प्रामाणिकपणा, समर्पण आणि ध्येय दृष्टीने कार्य करावे असेही त्या म्हणाल्या. तर डॉ. राकेश बरोट यानी संस्थेच्या अभिमानास्पद कामगिरीचा गौरव केला. विद्यार्थिनींनी भावनिक दृष्ट्या समर्थ राहिले पाहिजे. त्यासाठी छंद जोपासावे, वाचन करावे, असेही बारोट म्हणाले. संस्थेच्या प्राचार्या प्राची धारप यांनी वार्षिक अहवाल वाचन केले. नर्सिंग ट्युटर वर्षा पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक–सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
www.diwanews.com
सोमवार, दि. १५ जानेवारी २०२४


# दिव्यात रस्ता कामाच्या नावाने लूट ?

## दिवा शीळ रस्त्याच्या कामात गैरव्यवहार असल्याचा मनसेचा आरोप





## ४.५ किलोमीटरच्या रस्त्यासाठी ३७ कोटींचा खर्च

**दिवा:–** दिव्यात कोटीच्या कोटी रुपये निधी येतोय आणि त्यातून विकास होतोय असं दाखवलं जातंय पण प्रत्यक्षात फक्त कंत्राटदार आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांचे खिसे भरले जातायत. यासाठी दिवा–शीळ रस्त्याचे काम हे जिवंत असल्याचा आरोप दिवा मनसेने केला आहे.

दिवा शीळ रस्त्याच्या ४.५ किमी च्या कामासाठी २०१९ मध्ये १६.८८ कोटी रुपयांची कामाची ऑर्डर महापालिकेकडून काढण्यात आली.

शिळफाटा ते दिवा चौक पर्यंत एकूण २४ मीटरच्या रस्त्याचे काम त्यात देण्यात आले होते. सदर रस्त्याचे काम हे २ वर्षात पूर्ण करायचे होते. ज्याला २ वर्षाची मुदतवाढ देण्यात आली. पण ४ वर्षे उलटूनही अजून रस्त्याचे काम ५०% सुद्धा पूर्ण झालेलं नाही.

जून २०२२ मध्ये विशेष निधी म्हणून ७२ कोटी रुपये देण्यात आले. त्यातले अंदाजे २० कोटी रुपये याच दिवा–शीळ रस्त्यासाठी पुन्हा देण्यात आले.

म्हणजे ४.५ किलोमीटरच्या रस्त्यासाठी साधारण ३७ कोटी रुपये देण्यात आले. याचाच अर्थ प्रत्येक एककिलोमीटर साठी अंदाजे ८ कोटी ३३ लाख रुपये खर्च होतोय असा दावा दिवा मनसेच्या वतीने तुषार पाटील यांनी केला आहे.

महत्वाचं म्हणजे आधी १६.८८ कोटीचं कंत्राट हे बिटकॉन कंपनीला देण्यात आले होते आणि आता विशेष निधीमध्ये देण्यात आलेले अंदाजे २० कोटींचे काम हे ए आय एस इन्फ्रास्ट्रक्चर यांच्या कडे देण्यात आले आहे. एकाच रस्त्याच्या कामासाठी दोन वेगवेगळ्या कंत्राटदारांना काम देण्यात आले आहे हे कसं ? असा सवाल मनसेने उपस्थित केला आहे.

दोन्ही कामांना दिलेली मुदत ही आधीच संपलेली आहे. मग आता सुरू असलेले काम नक्की कोणत्या कंत्राटदाराकडून सुरू आहे ?

दिवा मनसेचे शिष्टमंडळ पुढच्या आठवड्यात ठाणे महापालिका आयुक्तांची भेट घेऊन संपूर्ण पुरावे आयुक्तांसामोर मांडून दिवा शीळ रस्त्याच्या कामाच्या चौकशीची मागणी करणार असल्याची माहिती दिवा मनसेच्या वतीने देण्यात आले आहे.

# दिव्यात आई ग्रुप आयोजित दशावतार नाट्य प्रयोग संपन्न




**दिवा:–**दिव्यात आई ग्रुप तर्फे आयोजित दशावतार नाट्य प्रयोग नुकताच संपन्न झाला.चित्रांगी गंधर्व उध्दार दशावतारी क्षेत्रातील अभिनय कुमार नितीन आसयेकर यांच्या तुफान गाजलेला नाट्य प्रयोग दिव्यात प्रथमच समाजसेवक उमेश पाटील यांनी ग्लोबल स्कूल मैदानात आयोजित केला होता.

प्रसंगी शेकडो दिवेकर नागरिकांनी दशावतारी नाटकास उपस्थिती लावली. यावेळी अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.





# नौपाडा-कोपरी प्रभागातून १८ बेवारस वाहने आणि १८ टपऱ्यांचे निष्कासन





ठाणे : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतील सर्वंकष स्वच्छता मोहीम ठाणे महापालिका क्षेत्रात सुरू आहे. वागळे इस्टेट, वर्तकनगर या प्रभाग समिती क्षेत्रानंतर शनिवार, १३ जानेवारीपासून नौपाडा-कोपरी प्रभाग समिती क्षेत्रात सर्वंकष स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे.

या मोहिमेच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने नौपाडा-कोपरी क्षेत्रातील रस्त्यावरील बेवारस वाहने हटविण्यात येत आहेत. महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांच्या निर्देशानुसार, परिमंडळ उपायुक्त शंकर पाटोळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई सुरू आहे. त्यात, नारायण कोळी चौक, चेंदणी कोळीवाडा, बारा बंगला, कोपरी कॉलनी येथील १३ बेवारस-भंगार वाहने उचलून बाटा कंपाऊंड येथे नेण्यात आली. तसेच, परबवाडी, मेंटल हॉस्पिटल, सिव्हिल रुग्णालयाच्या मागे, व बंजारा वस्ती परिसर या भागातून पाच बेवारस वाहने आणि १८ टपऱ्या हटविण्यात आल्या.



# आता माणुसकीच्या भिंतीने ठाणेकरांना मिळाले 'पोलीस दादा'

**ठाणे : पोलीस ठाणे आणि न्यायालयाची पायरी शहाण्या माणसाने चढू नये अशी प्रचलित म्हण आहे. मात्र आता ठाणे शहर पोलीस दलातील नौपाडा पोलिसांनी नागरिकांच्या मनातील कमी करण्याबरोबर गोरगरिब नागरिकांसाठी मदतीचा हात देण्याचा सामाजिक उपक्रम हाती घेतला आहे. यामध्ये घरातील नको असलेले कपडे, पुस्तक, वही, भांडी, खेळणी आदी वस्तू नौपाडा पोलीस ठाण्याच्या बाहेर ठेवलेल्या बास्केटमध्ये दान करण्याची व्यवस्था तयार केली आहे. ज्या गरजू व्यक्तीला एखादी वस्तू हवी असल्यास त्या बास्केट मधून नेता येणार आहे. अशाप्रकारे माणुसकीच्या भिंतीतून पोलिसांनी पोलीस दादा ही नवीन ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.**




**ठाणे पोलीस सामाजिक सलोखा राखण्यासाठी कायमच तत्पर असून, माणुसकीच्या नात्याने मदतीसाठी कायमच पुढाकार घेतात. त्यातूनच नौपाडा पोलीस ठाण्यात पोलीस दादाची माणुसकीची भिंत हा उपक्रम हाती घेतला आहे. तसेच या परिसरातील नागरिकांना त्यांच्या घरातील नको असणाऱ्या वस्तू बास्केटमध्ये ठेवण्याचे आवाहन केले आहे. या बास्केट मधील वस्तू गरजूला हवी असल्यास ते घेऊन जाण्याचे सांगितले आहे.**

– **रविंद्र क्षीरसागर** वरिष्ठ पोलीस निरीक्षक (नौपाडा पोलीस स्टेशन)

घरात नको झालेल्या जुन्या वाटणाऱ्या वस्तू काही वेळेस कचऱ्यात जातात. परंतु कचऱ्यात पडलेली वस्तू एखाद्याची गरज होऊ शकते. या पार्श्वभूमीवर गरज वंताची गरज पूर्ण होईल आणि देणाऱ्या व्यक्तीला समाधान मिळेल या दृष्टिकोनातून ठाणे शहर पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली नौपाडा पोलीस ठाण्यात हा उपक्रम हाती घेतला.

नौपाडा पोलिसांनी पोलीस ठाण्याच्या बाहेरच पोलीस दादाची माणुसकीची भिंत असा बॅनर लावलेला आहे. या ठिकाणी काही बास्केट ठेवण्यात आले आहेत. त्यामध्ये घरातील जुने कपडे, भांडी, खेळणी, पुस्तके इत्यादी वस्तू ठाणेकर नागरिकांना दान करण्याचे आवाहन केले आहे. तसेच त्या बास्केट मधील कोणती वस्तू एखाद्या गरजू व्यक्तीला हवी असल्यास ही वस्तू घेऊन जाता येणार आहे. असे ही पोलिसांनी म्हटले.

# पंतप्रधानांच्या हस्ते नवी मुंबईत अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा अटल सेतूचे उद्घाटन




**मुंबई : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज नवी मुंबईत अटलबिहारी वाजपेयी शिवडी–न्हावा शेवा अटल सेतूचे उद्धाटन केले. मोदींनी छायाचित्र दालन आणि अटल सेतूच्या प्रदर्शनीय प्रतिकृतीचा आढावा घेतला.**

एमटीएचएल अटल सेतू १७,८४० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च करून बांधला गेला आहे आणि सुमारे २१.८ किमी लांबीचा ६–पदरी पूल आहे ज्याची लांबी समुद्रावर सुमारे १६.५ किमी आहे आणि जमिनीवर सुमारे ५.५ किमी आहे.

''आमच्या नागरिकांसाठी 'जीवन सुलभता' वाढवण्याच्या दृष्टीने एक पुढचे महत्त्वपूर्ण पाऊल असलेल्या अटल सेतूचे उद्धाटन करताना आनंद होत आहे. हा पूल प्रवासाचा वेळ कमी करेल आणि कनेक्टिव्हिटी वाढवेल ज्याद्वारे दैनंदिन प्रवास सुरळीत होईल.''

पंतप्रधानांच्या समवेत राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार उपस्थित होते.

### अटल बिहारी वाजपेयी शिवडी – न्हावा शेवा अटल सेतू

शहरी वाहतूक पायाभूत सुविधा आणि कनेक्टिव्हिटी बळकट करून नागरिकांची 'प्रवास सुलभता' सुधारणे हे पंतप्रधानांचे ध्येय आहे. या संकल्पनेनुसार, मुंबई ट्रान्स हार्बर लिंक (एमटीएचएल), आता 'अटल बिहारी वाजपेयी शिवडी – न्हावा शेवा अटल सेतू' नामकरण झालेला पूल बांधण्यात आला आहे. डिसेंबर २०१६ मध्ये पंतप्रधानांच्या हस्ते पुलाची पायाभरणी करण्यात आली होती.



एकूण १७,८४० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च करून अटल सेतू बांधण्यात आला आहे. हा सुमारे २१.८ किमी लांबीचा ६–पदरी पूल आहे ज्याची लांबी समुद्रावर सुमारे १६.५ किमी आहे आणि जमिनीवर सुमारे ५.५ किमी आहे. हा भारतातील सर्वात लांब पूल आहे आणि भारतातील सर्वात लांब सागरी पूल देखील आहे. हा मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ यांना जलद कनेक्टिव्हिटी प्रदान करेल आणि मुंबई ते पुणे, गोवा आणि दक्षिण भारत दरम्यानचा प्रवासाचा वेळ देखील कमी करेल. यामुळे मुंबई बंदर आणि जवाहरलाल नेहरू बंदर यांच्यातील कनेक्टिव्हिटी देखील सुधारेल.




# ठाण्यात ठाकरेंच्या शिवसेनेकडून 'मोदी नकोच'चे बॅनर

## उपजिल्हाप्रमुख संजय घाडीगावकर यांनी मुख्यमंत्र्यांच्या मतदारसंघात लावले बॅनर

**ठाणे:–** शुक्रवारी मोदींचा मुंबई दौरा झाल्यानंतर ठाकरेंच्या शिवसेनेने ठाण्यात मुख्यमंत्र्यांच्या मतदारसंघात मोदी नकोच आणि मोदींसोबतचे ढोंगी पण नको अशा आशयाचे बॅनर लावून प्रधानमंत्री मोदी आणि मुख्यमंत्री शिंदे यांच्यावर हल्लाबोल केला आहे.

ठाकरेंच्या शिवसेनेचे ठाणे उपजिल्हाप्रमुख संजय घाडीगावकर यांनी कोपरी पाचपखाडीत विधानसभा मतदारसंघात मोदी नकोच अशा आशयाचे बॅनर लावले असून या बॅनरची ठाणेकरांत चर्चा आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे एकीकडे मोदींचे भरभरून कौतुक करत असताना त्यांच्याच मतदारसंघात मोदी नकोच आणि मोदींसोबतचे ढोंगी पण नको असे म्हणत मोदींसह एकनाथ शिंदेंवर ठाकरेंच्या शिवसेनेचे संजय घाडीगावकर यांनी हल्लाबोल केला आहे.

याबाबत ठाकरेंच्या शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख संजय घाडीगावकर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी म्हटले की,देशात प्रचंड महागाई वाढवून सामान्य जनतेला वेठीस धरणारे मोदी २०२४ ला नकोच अशी जनतेची भावना आहे. आणि जे लोक पळपुटेपणा करून शिवसेना चोरीच्या षड्यंत्रात सामील होऊन मातोश्री आणि ठाकरे कुटुंबावर आरोप करून बाहेर पडले आहेत ते ढोंगी पण २०२४ ला नको अशी जनतेची भावना आहे असे संजय घाडीगावकर यांनी या बॅनरवर प्रतिक्रिया देताना म्हटले आहे.

मोदींनी कितीही आश्वासन दिली तरी सामान्य जनतेची भावना ही मोदी नको अशा स्वरूपाची असून देशात लोकशाही वाचवण्यासाठी मोदींचा पराभव सर्वसामान्य जनता करेल असा विश्वास घाडीगावकर यांनी व्यक्त केला आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. १५ जानेवारी २०२४
पान : ६
www.diwanews.com

## ठाण्यात महानगर गॅस पाईपलाईन गळती

**ठाणे:** नौपाडयातील विष्णु नगर येथे वक्रतुंड सोसायटीचे नविन कंट्रक्शनचे काम सुरू असताना त्या ठिकाणी फावड्याचा धक्का लागल्याने गॅस पाईप लाईन लिकेज झाली. ही घटना गुरुवारी सकाळी सव्वा दहा वाजण्याच्या सुमारास समोर आली. गॅस कर्मचाऱ्यांनी गॅस पाईप लाईनचा मुख्य वॉल्व बंद करून पाईप लाईनच्या दुरुस्तीचे काम सुरू केले आहे. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी महानगर गॅस कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन विभागाचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेतली होते.

# म्हाडातील भ्रष्टाचाराच्या विरोधात विक्रांत चव्हाण आंदोलन छेडणार

**ठाणे** – ठाणे महापालिका हद्दीतील म्हाडा अभिन्यासातील जुन्या वसाहतींची पुनर्बांधणी करताना मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे. स्थानिक मराठी माणसांवर दबाव आणून त्यांची फसवणूक केली जात आहे. संघटीत गुन्हेगार, ठाणे महापालिका, म्हाडा, मंत्रालयातील अधिकारी आणि राजकीय पुढारी यांच्या संगनमताने हाभ्रष्टाचार सुरु आहे. ठाणे महापालिका आयुक्त अभिजित बांगर व म्हाडाचे उपाध्यक्ष संजीव जयस्वाल यांनी सदर प्रकरणाची सखोल चौकशी करावी अन्यथा उपोषण आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ठाणे काँग्रेसचे अध्यक्ष आणि माजी नगरसेवक विक्रांत चव्हाण यांनी आज एका पत्रकार परिषदेत दिला.

कोपरी-पाचपाखाडी, सावरकरनगर, शिवाईनगर, वर्तकनगर, वसंत विहार या विभागात म्हाडाच्या इमारती आणि राखीव भुखंड आहेत. या इमारतींचा पुर्नविकास करताना राजकीय पुढारी आणि विकासक संगनमत करून एकत्र आले आहेत. मात्र पुनर्विकास करतांना म्हाडाच्या इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांना विश्वासात घेतले जात नसल्याचा आरोप विक्रांत चव्हाण यांनी केला आहे.

म्हाडा प्राधिकरणाची वर्तकनगर येथे १६ एकर जमीन आहे. त्यावर ७२ इमारती आणि १९ बैठी चाळी आहेत. ठाणे महापालिका अस्तित्वात आल्यानंतर या ठिकाणी १९९० च्या दशकात विकास प्रस्ताव मंजूर करण्यात आला. तेव्हा येथे डीपी रोड, अंतर्गत रस्ते, शाळांसाठी राखीव भूखंड, सुविधा भूखंड, हॉस्पिटल, पोस्ट ऑफिस, रेशनिंग दुकान यासाठी राखीव भूखंड ठेवण्यात आलेले आहेत. मात्र या भूखंडांवर अतिक्रमणे झाली. येथे २००९ साली पुन्हा विकास प्रस्ताव नव्याने आणला गेला व अडीच एफएसआय या भागाला देण्यात आला. वाढीव एफएसआय या भागाला मिळाल्याने सर्व ॲमेनिटी वाढविण्याची मागणी तत्कालीन मुख्यमंत्र्यांकडे मी केल्यानंतर अटीशर्थीच्या आधारे वाढीव एफएसआय मंजूर करण्यात आला. मात्र येथील इमारतींची पुनर्बांधणी करताना गुंडांचा विकासक म्हणून शिरकाव झाला आणि पुनर्बांधणी रखडली. मात्र आता पुनर्बांधणी करताना पर्यावरण विषयक परवानग्या घेतल्या गेलेल्या नाहीत. सुविधा भूखंड, ॲमेनिटी , क्रिडांगणे चोरीला गेलेली आहेत. म्हाडाच्या इमारतीचा एकत्र विकास करू नये असे असताना दबावाखाली एकत्रितपणे पुनर्बांधणी केली जात आहे. म्हाडामध्ये प्रचंड भ्रष्टाचार बोकाळला असल्याने हे घडत असल्याची टीका विक्रांत चव्हाण यांनी केली आहे.



म्हाडातील अधिकारी, राजकीय पुढारी आणि ठाणे महापालिका अधिकाऱ्यांच्या संगनमताने हे सर्व प्रकार सुरु असून या संदर्भात ठाणे महापालिका आयुक्त अभिजित बांगर व म्हाडाचे उपाध्यक्ष संजीव जयस्वाल यांना लेखी निवेदन दिले आहे. झालेली अतिक्रमणे काढणे, रहिवाशांसाठी ॲमेनिटी उपलब्ध करून देणे या अटीशर्थींची पूर्तता करण्याची मागणी निवेदनात केली आहे. वर्तकनगर येथे खोटी कागदपत्रे सादर करून एफएसआयचीही चोरी झालेली आहे. म्हाडाचा एक भूखंड कोणतीही निविदा न काढता एका व्यक्तीला दिला गेलेला आहे. एका विकासकाने ४५ आणि ४७ या दोन इमारतींची एकत्र पुनर्बांधणी करतांना वहिवाटीचा रस्ता बंद केला आहे. त्याला वाचविण्यासाठी मंत्रालयातून फोन येत आहेत. त्याने गटारे खोदली आहेत. झाडे तोडली आहेत. त्याचा विकास प्रस्ताव ठाणे महापालिकेने फेटाळला आहे तरी हुकूमशाहीच्या जोरावर तो इमारत बांधण्याचा प्रयत्न करत आहे. या सर्व प्रकारामुळे स्थानिकांवर अन्याय होणार आहे. नागरिकांना एकत्रित सुविधा मिळाव्यात, योग्य चौरस फूट घर मिळावे, म्हाडातील कामकाज भ्रष्टाचार मुक्त व्हावे यासाठी उपोषण आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा विक्रांत चव्हाण यांनी दिला.

# सर्व विभागांनी जिल्हा वार्षिक नियोजनाचा निधी ३१ मार्चपूर्वी १०० टक्के खर्च करावा –पालकमंत्री शंभूराज देसाई



**ठाणे :–** सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील जिल्हा नियोजन अंतर्गत प्रशासकीय मान्यता ७२ टक्के देण्यात आल्या असून आतापर्यंत खर्चाचे प्रमाण ३८ टक्के आहे. मात्र ३१ मार्च २०२४ पूर्वी सर्व विभागांनी जिल्हा वार्षिक नियोजनाचा निधी १०० टक्के खर्च करावा, असे निर्देश पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी आज येथे दिले.

जिल्हा वार्षिक नियोजन समितीची बैठक आज पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन भवन येथे संपन्न झाली, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी आमदार महेश चौगुले, रईस शेख, किसन कथोरे, डॉ.बालाजी किणीकर, कुमार आयलानी, गणपत गायकवाड, प्रमोद (राजू) पाटील, रमेश पाटील, श्रीमती गीता जैन, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, ठाणे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मनुज जिंदल, ठाणे महापालिका आयुक्त अभिजित बांगर, नवी मुंबई महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर, कल्याण-डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ.इंदू राणी जाखड, मिरा-भाईंदर महापालिका आयुक्त संजय काटकर, उल्हासनगर महापालिका आयुक्त अजित शेख, भिवंडी महापालिका आयुक्त अजय वैद्य, अपर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये-धुळे, निवासी उपजिल्हाधिकारी सुदाम परदेशी, जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी यांच्यासह विविध शासकीय विभागांचे विभाग-कार्यालय प्रमुख उपस्थित होते.

पालकमंत्री देसाई म्हणाले की, ठाणे जिल्ह्यातील विविध विकास कामांचा आराखडा तयार करून त्यावर होणाऱ्या खर्चाच्या अनुषंगाने जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्ह्याचा नियतव्यव ठरत असतो. त्यात मागील वर्षी २०२३-२४ साठी वाढीवसह ७५० कोटींच्या आराखड्यास मंजुरी देण्यात आली होती. यंदाच्या वर्षी जिल्ह्यातील कामांची निकड, कामांची आवश्यकता आणि लोकप्रतिनिधींची मागणी याचा विचार करून रुपये १ हजार १६ कोटींचा एकत्रित जिल्हा नियोजन आराखडा शासनाला सादर करण्यात येणार आहे.

जिल्ह्याच्या ग्रामीण आणि शहरी भागाच्या विकासासाठी जिल्हा नियोजन समितीद्वारे मिळणारा निधी अत्यंत महत्त्वाचा असतो. ठाणे जिल्ह्यासाठी राज्यस्तरीय बैठकीत सन २०२२-२३ साठी ६१८ कोटी इतका नियतव्यय मंजूर करण्यात आला होता. सन २०२३-२४ साठी ४७८ कोटी ६३ लाखांच्या प्रारूप आराखड्यास जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मंजूरी देण्यात आली होती.यामध्ये गाबासाठी २७२ कोटी तर बिगर गाबासाठी १८२ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे एकंदर सुमारे १४० कोटींची घट झाल्याचे दिसून आले होते. त्यानंतर ठाणे जिल्ह्याचा नियतव्यय ९०२ कोटी इतका वाढून मिळावा, यासाठी राज्यस्तरीय बैठकीत करण्यात आली होती. त्यावेळी वाढीव निधीसह ७५० कोटींच्या आराखड्यास शासनाने मंजूरी दिली होती.

त्यात सन २०२३-२०२४ च्या मंजूर कामांपैकी ७२ टक्के कामांना प्रशासकीय मंजूरी देण्यात आली असून आतापर्यंत ३८ टक्के खर्च झाला आहे. तसेच उर्वरित प्रशासकीय मंजूरी तात्काळ देण्याचे आदेश प्रशासनाला दिले असल्याची माहिती पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिली. मागील वर्षी २०२३-२०२४ साठी वाढीवसह ७५० कोटींच्या आराखड्यास मंजूरी देण्यात आली होती. तर, यंदाच्या वर्षी शासनाने ६३५ कोटींचा आरखडा सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. मात्र, जिल्ह्यातील कामांची निकड, कामांची आवश्यकता आणि लोकप्रतिनिधींची मागणी याचा विचार करून शासनाला विनंती करणारा रुपये १ हजार १६ कोटींचा एकत्रित जिल्हा नियोजन आराखडा तयार करण्यात आला असून त्यास जिल्हा नियोजन समितीने संमती दिली असल्याची माहिती पालकमंत्री तथा राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी या बैठकीत दिली.

या प्रस्तावित जिल्हा नियोजन आराखड्यास मंजुरी मिळण्यासाठी मंगळवार, दि.९ जानेवारी २०२४ रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय वित्त नियोजन समितीची बैठक होणार आहे. या बैठकीत निधी वाढवून मिळावा, यासाठीचे सादरीकरण करणार असल्याचे सांगून जिल्ह्यातील सर्व आमदारांनी या बैठकीला ऑनलाईन उपस्थित राहण्याचे आवाहन पालकमंत्री शंभूराजे देसाई यांनी यावेळी केले.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
www.diwanews.com
सोमवार, दि. १५ जानेवारी २०२४ पान : ७





# ठाण्यातील प्राचीन कौपिनेश्वर मंदिरापासून मुख्यमंत्र्यांनी केली साफसफाईला सुरुवात

**ठाणे :** राज्यातील सर्व मंदिरांमध्ये स्वच्छता करा, या मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत राज्याचे मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंदिराच्या साफसफाईंची सुरूवात आज (शनिवार, १३ जाने) ठाण्यातील प्राचीन असलेल्या कौपिनेश्वर मंदिरापासून केली. मुख्यमंत्री यांनी स्वत: हातात झाडू घेवून व तद्नंतर पाण्याने मंदिरच्या सभामंडपाची तसेच परिसराची साफसफाई केली. तसेच २२ जानेवारी रोजी अयोध्येमध्ये होणाऱ्या राम मंदिर उद्घाटनाच्या पार्श्वभूमीवर महापालिका हद्दीतील सर्व मंदिरे साफ करुन मंदिराना विद्युत रोषणाई करण्याच्या सूचनाही त्यांनी आयुक्त अभिजीत बांगर यांना दिल्या. टप्याटप्याने सर्व मंदिरांमध्ये स्वच्छता मोहिम हाती घेणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

ठाणे महानगरपालिकेच्या सर्वंकष स्वच्छता मोहिमेत ( ) अंतर्गत आज नौपाडा-कोपरी प्रभाग समितीतील सर्व विभागांमध्ये स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली होती. महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली ही सर्वंकष स्वच्छता मोहीम सुरू आहे. या मोहिमेत आमदार संजय केळकर, माजी महापौर नरेश म्हस्के, माजी नगरसेवक सुधीर कोकाटे, संजय वाघुले, परिवहन सभापती विलास जोशी, महापालिका आयुक्त अभिजीत बांगर, आदी सहभागी झाले होते. या मोहिमेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सहभाग घेवून ठाणे शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या ऐतिहासिक अशा कौपिनेश्वर मंदिरापासून मंदिराच्या साफसफाईला सुरवात केली. मुंबई ठाणे परिसरात सर्वंकष स्वच्छता मोहिम राबविल्यामुळे मुंबई ठाण्यातील प्रदुषणाचे प्रमाण कमी झाले आहे. तसेच केंद्र सरकारने राष्ट्रपती महोदयांच्या हस्ते महाराष्ट्राला स्वच्छतेतील प्रथम क्रमांक देवून गौरविले आहे ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब असल्याचेही मुख्यमंत्री शिंदे यांनी नमूद केले. मुंबई ठाण्यातील सर्वंकष स्वच्छता मोहिमेमध्ये सफाई कर्मचाऱ्यांबरोबरच महापालिकेचे अधिकारी कर्मचारी तसेच सर्वसामान्य नागरिक, शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक सहभागी होत असून ही मोहिम न राहता ती लोकचळवळ निर्माण करावयाची असल्याने या मोहिमेत जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे असेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नमूद केले.

ठाणे महापालिकेच्या नौपाडा कोपरी प्रभागसमिती अंतर्गत कोळीवाडा परिसरातील अष्टविनायक चौक ते सिडको बोगदा, स्वामी समर्थ मठ परिसर ते मंगला हायस्कूल परिसर, राऊत शाळा परिसर, कोपरी भाजी मार्केट व ठाणेकरवाडी परिसर, सिद्धाथनगर मेन रोड, बारा बंगला परिसर, कोपरी गांव कन्हैय्या नगर रोड, आनंदनगर/ गांधीनगर, मेंटल हॉस्पिटल परिसर, भास्कर कॉलनी, एलबीएस रोड भक्ती मंदिर परिसर, नौपाडा पोलीस स्टेशन ते भास्कर कॉलनी ब्रीज, राम मारुती रोड, गोखले रोड, मासुंदा तलाव परिसर, ठाणे स्टेशन पूर्व व पश्चिम परिसर, पोलीस लाईन, खारटन रोड, सिडको, एस.टी स्टॅण्ड ते महागिरी, जांभळी नाका मार्केट परिसर, बिम्स नाला, रेल्वे नाला, जाफरशेठ नाला, वंदना नाला, आयटीआय ठाणेकरवाडी आदी परिसरात ही सर्वंकष स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. सर्व प्रथम रस्त्यावर झाडू मारुन ते स्वच्छ करणे, फूटपाथ तसेच रस्त्याच्या मधील दुभाजक स्क्रबरने घासून ते पाण्याने स्वच्छ करणे अशा पध्दतीने प्रभागसमितीतील मुख्य रस्ते, अंतर्गत रस्ते स्वच्छ करण्यात आले.

# विकास मिराशी यांच्या जीवनावरील 'न्यू इनिंग' हे पुस्तक प्रेरणादायी – आमदार संजय केळकर




**ठाणे :** धडपडणारा जो तरुण वयातील कोणत्याही क्षेत्रातील माणूस असेल त्याच्या हातात जर विनोद पितळे यांनी पत्रकार विकास मिराशी यांच्या जीवन संघर्षावर आधारित त्यांच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त लिहीलेले न्यू इनिंग हे पुस्तक पडल्यास त्या धडपडणाऱ्या तरुण माणसाला जीवन जगण्याचा रस्ता निश्चितच सापडेल.



ठाणेकरांना सुपरिचित, पत्रकारिता व छायाचित्रण, प्रसारमाध्यमात कार्यरत असणारा विकास मिराशी यांच्या जीवनावरील त्यांच्या पन्नासाव्या सुवर्ण महोत्सवी वाढदिवसानिमित्त विनोद पितळे यांनी लिहिलेल्या न्यू इनिंग या पुस्तक प्रकाशन सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून आमदार संजय केळकर बोलत होते. विकासचा संघर्ष हा ट्रेनच्या प्रवासा सारखा आहे. खिडकीची सीट मिळेपर्यंत प्रवासात संघर्ष करावा लागतो. सुरूवातीला चौथ्या सीटपासून संघर्ष सुरू होतो, मग तिसरी सीट, मग दुसरी व नंतर खिडकीजवळची सीट मिळते. न्यू इनिंग या पुस्तकात पत्रकार विकास मिराशी यांचा संघर्षमयी जीवन प्रवास लेखक विनोद पितळे यांनी खुप चांगल्या प्रकारे मांडला आहे.

विकास मिराशी यांनी अपयश आलं म्हणून कधी खचून जाऊन जीवनरुपी ट्रेन कधी सोडली नाही. आयुष्याच्या प्रत्येक वळणावर ते चालत राहिले, म्हणूनच हे विनोद पितळे यांचे पुस्तक प्रेरणादायी आहे असे केळकर यांनी पुढे नमुद केले. कवी, साहित्यिक, गझलकार विनोद पितळे यांचे हे विसावे पुस्तक. १२ जानेवारी रोजी ठाणे मराठी ग्रंथ संग्रहालय, वा. अ. रेगे सभागृहात पुस्तक प्रकाशन सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या सोहळ्याला ठाणे शहर दैनिक पत्रकार संघाचे अध्यक्ष आनंद कांबळे, उद्योजक अरुण सोनार, आमदार संजय केळकर उपस्थित होते.

आनंद कांबळे, अरुण सोनार यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. पुस्तकाचे लेखक विनोद पितळे यांनी प्रास्ताविक केले. सुभाष कुदळे यांच्या सिद्धीफ्रेंड्स पब्लिशिंगने आकर्षक मुखपृष्ठासह या पुस्तकाची मांडणी केली आहे. एकाच संकेतस्थळावर सर्व पेपर वाचकांना वाचता यावेत म्हणून न्यूज पेपर पार्क या नवीन संकल्पना असलेल्या संकेतस्थळाचे उद्घाटनही संजय केळकर यांच्या हस्ते करण्यात आले. विकास मिराशी यांचा समस्त मित्रपरिवार यावेळी उपस्थित होता.सरते शेवटी संजय केळकर यांनी विकासच्या आयुष्यात आम्ही सतत त्याच्या सोबत आहोत, त्यामुळे विकासला भिण्याचे कोणतेही कारण नाही अशा शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रतिक्षा बोर्डे यांनी केले.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. १५ जानेवारी २०२४

www.diwanews.com

# उद्धव ठाकरेंचा दिव्यात झंझावात!





## दिव्यातील पाणीटंचाईला जबाबदार असणाऱ्या शिंदे गटाला पाण्यात बुडवा

### शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंचा हल्लाबोल

**दिवा:–** कल्याण लोकसभा मतदारसंघाच्या दौऱ्यावर असताना शनिवारी संध्याकाळी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंचा दिव्यात झंझावात पाहिला मिळाला. शिवसैनिकांशी संवाद साधताना दिव्यातील पाणीटंचाईला जबाबदार असणाऱ्या शिंदे गटाला पाण्यात असं बुडवा की पुन्हा त्यांनी डोकं वर काढू नये,असा हल्लाबोलच उद्धव ठाकरे यांनी पाणी प्रश्नावर बोलताना केला.

उद्धव ठाकरेंच्या स्वागतासाठी शिवसैनिक मोठ्या संख्येने दिवा टर्निंग येथे जमले होते.ठाकरेंच्या शिवसेनेच्या दिवा शहर महिला संघटिका ज्योती पाटील यांच्या कार्यालयाजवळ उद्धव ठाकरे यांचे सुरुवातीला जल्लोषात स्वागत झाले.यावेळी शिवसेनेच्या महिला आघाडी कडून ज्योती पाटील यांच्या माध्यमातून उद्धव ठाकरे यांना गदा भेट देण्यात आली.

दिवा आगासन रोड येथील ज्योती पाटील यांच्या कार्यालयाजवळ स्वागत व कार्यालय भेट झाल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी दिवा टर्निंग येथे उपस्थित शिवसैनिकांना संबोधित केले. कल्याण लोकसभेतील गद्दारांची घराणेशाही गाडण्याचा निर्धार दिवावासीयांनी करावा असे आवाहन उद्धव ठाकरेंनी यावेळी केले.राम मंदिराच्या उद्घाटना बद्दल बोलताना उद्धव ठाकरे यांनी जनतेला शुभेच्छा दिल्या व २२ तारखेला काळाराम मंदिर येथे शिवसेनेच्या माध्यमातून महाआरती केली जाणार असल्याचे यावेळी सांगितले. दिव्यात निवडणुका आल्या की दरवर्षी दहा एमएलडी पाणी वाढवल्याच्या घोषणा होतात.मात्र नागरिकांना पाणी मिळत नाही. २२१ कोटीची पाणी योजना झाली पण लोकांना मुबलक पाणी मिळाले का?असा सवाल उद्धव ठाकरे यांनी दिवावासीयांना विचारला.जर दिवा वासियांना पाणी मिळत नसेल तर आता त्यांना पाण्यात बुडवा असा हल्लाबोल शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिव्यातील शिंदे गटाच्या भूमिकेवर केला.यावेळी हजारो शिवसैनिक व नागरिक उस्फुर्त व मोठ्या संख्येने उपस्थित होते. कोणतीही सभा नसताना नागरिकांनी केलेली प्रचंड गर्दी पाहून उद्धव ठाकरे यांनी कल्याण लोकसभेत आपलाच विजय होणार असा विश्वास व्यक्त केला.यावेळी शिवसेना नेते संजय राऊत व राजन विचारे देखील उपस्थित होते.






